आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in शुक्रवार दिनांक 01/08/2026 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन | पिंपरी चिंचवड व पुणे | पान 4 | अंक 171 | RNI - MAHMAR /2021/51259 | metrocity924@gmail.com

# कासारवाडी रेल्वे क्रॉसिंग फाटक बंद करू नका

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी - मावळ लोकसभा मतदारसंघातील कासारवाडीगाव रेल्वे मार्गामुळे पूर्व व पश्चिम अशा दोन भागांत विभागले गेले असून, रेल्वे क्रॉसिंग फाटक क्रमांक-61 हा या दोन्ही भागांना जोडणारा एकमेव व अत्यंत महत्त्वाचा संपर्कमार्ग आहे. हे फाटक कायमस्वरूपी बंद झाल्यास दररोज हजारो नागरिकांना अनावश्यकपणे मोठा वळसा घालावा लागेल. त्यामुळे त्यांच्या दैनंदिन प्रवासावर, सामाजिक व आर्थिक व्यवहारांवर तसेच सर्वसामान्य जनजीवनावर विपरीत परिणाम होईल. फाटक बंद करण्याच्या प्रस्तावाचा पुनर्विचार करून फाटक पूर्ववत सुरू ठेवण्याची मागणी शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी रेल्वे विभागाकडे केली आहे.**



खासदार बारणे यांनी मध्य रेल्वेचे महाप्रबंधक यांना याबाबत निवेदन दिले आहे. त्यात म्हटले आहे की, मावळ लोकसभा मतदारसंघातील कासारवाडी येथील रेल्वे क्रॉसिंग फाटक क्रमांक-61 कायमस्वरूपी बंद करण्याबाबत रेल्वे प्रशासनाकडून सूचना जारी करण्यात आली असून, त्यासंदर्भात स्थानिक नागरिकांनाही माहिती देण्यात येत आहे. या प्रस्तावाबाबत स्थानिक नागरिक, लोकप्रतिनिधी तसेच विविध सामाजिक संघटनांकडून गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली आहे. कासारवाडीगाव रेल्वे मार्गामुळे पूर्व व पश्चिम अशा दोन भागांत विभागले गेले असून, रेल्वे फाटक क्रमांक-61 हा या दोन्ही भागांना जोडणारा एकमेव व अत्यंत महत्त्वाचा संपर्कमार्ग आहे. कासारवाडी पश्चिम भागातील अनेक विद्यार्थी पूर्व भागातील श्री छत्रपती शाहू महाराज विद्यालयात शिक्षण घेत आहेत. फाटक बंद झाल्यास विद्यार्थ्यांना लांब व गैरसोयीचा मार्ग वापरावा लागेल. त्यामुळे त्यांच्या वेळेची, सुरक्षिततेची तसेच शिक्षणाची हानी होण्याची शक्यता आहे.

याशिवाय कासारवाडी येथे दरवर्षी गणेश विसर्जन मिरवणूक, एक गाव-एक शिवजयंती मिरवणूक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, रामनवमी, हिंदू नववर्ष (गुढी पाडवा), बसवराज महाराज मिरवणूक, ईद-ए-मिलाद तसेच श्री भैरवनाथ यात्रा व पालखी असे अनेक धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यक्रम आयोजित केले जातात. या सर्व कार्यक्रमांच्या यशस्वी व सुरळीत आयोजनासाठी या रेल्वे फाटकाचा वापर केला जातो. फाटक बंद झाल्यास या पारंपरिक कार्यक्रमांच्या आयोजनात व व्यवस्थापनात गंभीर अडथळे निर्माण होतील आणि स्थानिक नागरिकांना मोठ्या प्रमाणावर गैरसोयींचा सामना करावा लागेल.

याशिवाय अंत्यसंस्कार, अंत्ययात्रा तसेच इतर आपत्कालीन परिस्थितींमध्ये अग्निशमन दल, रुग्णवाहिका, पोलीस व इतर अत्यावश्यक सेवांकडूनही याच मार्गाचा वापर केला जातो. फाटक बंद झाल्यास आपत्कालीन सेवांच्या हालचालींमध्ये विलंब होण्याची शक्यता असून, त्यामुळे नागरिकांच्या जीवित व सुरक्षिततेवर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. रेल्वे विभागामार्फत कासारवाडी रेल्वे क्रॉसिंग फाटक क्रमांक-61 कायमस्वरूपी बंद करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी तसेच पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड यांच्याकडून ना हरकत प्रमाणपत्र (NOC) प्राप्त करण्यात आले आहे. तथापि, सदर ना हरकत प्रमाणपत्र देताना स्थानिक नागरिकांची संमती, त्यांच्या गरजा तसेच जनभावनांचा पुरेसा विचार करण्यात आलेला नसल्याचे खासदार बारणे यांनी निवेदनात म्हटले आहे.

# आमदार शंकर जगताप यांचा "मास्टर प्लॅन"

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : शहराची झपाट्याने वाढणारी लोकसंख्या, ग्राहकसंख्या आणि विजेची मागणी लक्षात घेऊन पिंपरी-चिंचवडची वीज वितरण व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी चिंचवड विधानसभा क्षेत्राचे आमदार शंकर जगताप यांनी पुढाकार घेतला आहे. वीज विषयक प्रलंबित कामांना गती देण्यासाठी आयोजित बैठकीत त्यांनी महापारेषण आणि महावितरणला कालबद्ध, परिणामकारक आणि भविष्यवेधी नियोजन करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.**



पिंपरी चिंचवड मतदारसंघनिहाय वीज वितरण सनियंत्रण समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या समित्यांमार्फत स्थानिक वीजसमस्यांचा नियमित आढावा घेतला जाणार आहे. महत्वाचे म्हणजे पिंपरी चिंचवड राजगुरुनगर, लोणावळासह नवीन परिमंडळाचा प्रस्ताव ठेवण्यात आला असून, यामुळे शहराला स्वतंत्र वीज परिमंडळ मिळून प्रशासकीय कामांना मोठी गती मिळणार आहे आणि ग्राहकांच्या तक्रारींचे जलद गतीने निवारण होण्यास मदत होणार आहे.मुख्य म्हणजे पुढील सहा महिन्यांत पाषाण-सांगवी वीजवाहिनी, यशदा परिसरात नवीन वीज उपकेंद्र, पिंपरी-चिंचवड शहरासाठी आवश्यक नवीन वीज उपकेंद्रे आणि सबस्टेशनचा सविस्तर प्रकल्प अहवाल, गहुंजे येथील प्रस्तावित 220/22 केव्ही, 300 एमव्हीए क्षमतेच्या अतिउच्चदाब उपकेंद्राच्या प्रस्तावाला गती देण्याबाबत चर्चा झाली. अधिकाऱ्यांनी कोणती कामे पूर्ण करायची, प्रत्येक कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल प्रस्ताव मुख्य कार्यालयाकडे कधी पाठविणार आणि मंजुरीपासून निविदा प्रक्रियेपर्यंत किती कालावधी लागणार, याचे निश्चित वेळापत्रक तयार करण्याच्या सूचना बैठकीत देण्यात आल्या. केवळ प्रस्ताव तयार करून न थांबता दर महिन्याला उद्दिष्ट निश्चित करून प्रत्यक्ष प्रगतीचा आढावा घेण्यावर भर द्या असे स्पष्ट निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

महावितरण 'प्रकाश भवन' कार्यालयामध्ये (दि 31) रोजी ही बैठक पार पडली. बैठकीमध्ये पिंपरी चिंचवड शहराच्या सुनियोजित व्यवस्थित आणि सक्षम वीज पुरवठ्यासाठी आक्रमक भूमिका घेतली. यावेळी मुख्य अभियंता (महापारेषण) अनिल भारसाकळे,अधीक्षक अभियंता (महापारेषण) व्ही. डी. भुजबळ , अधीक्षक अभियंता (महापारेषण) जे. एम. कोकाटे, अधीक्षक अभियंता (सिव्हिल) पी. एच. काकडे , कार्यकारी अभियंता (पिंपरी) एस. एस. मुंडे, सहाय्यक कार्यकारी अभियंता (सांगवी) के. एस. गिरी, कार्यकारी अभियंता (भोसरी) व्ही. एस. लहाने, उपविभागीय अधिकारी (हिंजवडी) एस. बी. पाटील, उपविभागीय अधिकारी (खराळवाडी) डी. बी. तरंगे आदी उपस्थित होते.

# महानगरपालिकेच्या सेवेतून अधिकारी-कर्मचारी सेवानिवृत्त

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी- महानगरपालिकेच्या वतीने जूलै 2026 अखेर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणा-या 21 तसेच स्वेच्छा सेवानिवृत्ती घेतलेल्या 14 अशा एकूण 35 अधिकारी व कर्मचाऱ्यांचा मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.**




या कार्यक्रमास जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक,पिंपरी-चिंचवड कर्मचारी महासंघाच्या उपाध्यक्षा सुप्रिया सुरगुडे, नंदकुमार इंदलकर,मुख्य लिपिक माया वाकडे, विविध विभागांतील कर्मचारी आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय उपस्थित होते. जुलै 2026 मध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्यांमध्ये लेखाधिकारी प्रकाश ज्ञानोबा जाधव, कार्यालय अधिक्षक दौलत मदगे, सहाय्यक उद्यान निरीक्षक सुरेश कोळेकर, कॉम्प्युटर ऑपरेटर सुरेखा झेंडे, ज्ञानेश्वर शेडगे, मुख्याध्यापक सविता जाधव, जयश्री गळीतकर, उप शिक्षिका संगीता रोकडे, उज्ज्वला तापकीर, शिला सोनवणे, सर्व्हेअर मुकुंद क्षिरसागर, सुरक्षा सुपरवायझर भारत भले, रखवालदार राजेंद्र रायकर, ईश्वर बहोत, चंद्रकात राऊळ, मजूर दत्तात्रय काळभोर, दत्तात्रय टोपे, दिलीप गव्हाणे, शंकर धुमाळ, सफाई सेवक अशोक कांबळे, ज्योतीराम खैरमोडे यांचा समावेश आहे.

तर स्वेच्छा निवृत्त घेतलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी अरूण सुपे, कार्यकारी अभियंता राजेंद्र जावळे, मनोहर जावरानी, वायरलेस ऑपरेटर श्रीकृष्ण बाबर, दूरध्वनी चालक

जालिंदर साखरे, मुकादम राकेश गायकवाड, वंदना ओव्हाळ, शालन करडे, सफाई कामगार राजू शिंदे, बापू गायकवाड,अनिता रेड्डी,नमिना चव्हाण,सफाई सेवक राणू गायकवाड आणि भारत गायकवाड यांचा समावेश आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमोद जगताप यांनी,सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले तर आभार माया वाकडे यांनी मानले

# मुसळधार पावसामुळे शहरातील विविध भागांत झाडपडीच्या घटना

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी: मागील दोन दिवसांपासून शहरात झालेल्या मुसळधार पावसामुळे तसेच जोरदार वाऱ्यामुळे पिंपरी चिंचवडमधील विविध भागांत झाडपडीच्या घटना घडल्या. या घटनांची माहिती मिळताच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने तातडीने घटनास्थळी धाव घेत झाडे व तुटलेल्या फांद्या हटवून परिसर सुरक्षित करण्याची कार्यवाही केली.**



दोन दिवसात शहरातील सेक्टर 24, निगडी प्राधिकरण, फिनोलेक्स कंपनी परिसर, पिंपरी, ओम साई हौसिंग सोसायटी, आकुर्डी तसेच काजळे पेट्रोल पंप शेजारी, पुणे-नाशिक महामार्ग येथे झाडपडीच्या घटना घडल्या. अग्निशमन विभागाच्या पथकांनी त्वरित प्रतिसाद देत झाडे हटवली, वाहतुकीतील अडथळे दूर केले आणि परिसर नागरिकांसाठी सुरक्षित केला.

पावसाळ्यात जोरदार वारे आणि सततच्या पावसामुळे झाडे उन्मळून पडण्याच्या किंवा मोठ्या फांद्या तुटण्याच्या घटना घडू शकतात. त्यामुळे नागरिकांनी अशा परिस्थितीत संयम राखून आवश्यक ती खबरदारी घेणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे अग्निशमन विभागाने म्हटले आहे.पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर अग्निशमन विभागाची सर्व पथके 24 तास सज्ज असून, कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी त्वरित 101 या क्रमांकावर संपर्क साधावा, तसेच झाड कोसळलेल्या ठिकाणी अनावश्यक गर्दी करू नये, तुटलेल्या फांद्या तसेच विद्युत तारा किंवा वायरपासून सुरक्षित अंतर ठेवावे आणि स्वतः झाड किंवा फांद्या हटवण्याचा प्रयत्न करू नये असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने केले आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
शुक्रवार दिनांक 01/08/2026
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# उसने दिलेल्या पैशांच्या वादातून तरुणाव चाकू व दांडक्यानेजीवघेणा हल्ला

## दोघांविरुद्ध आळंदी पोलिसांत गुन्हा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड प्रतिनिधी :**

**उसने दिलेल्या पैशांच्या वादातून एका 27 वर्षीय तरुणावर चाकू व लाकडी दांडक्याने जीवघेणा हल्ला झाल्याची घटना आळंदी-मरकळ रोडवरील कल्चर हॉटेल शेजारील ओढ्यालगत घडली. या प्रकरणी आळंदी पोलीस ठाण्यात दोन जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम 109(1) व 3(5) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महादेव परमेश्वर काळे (वय 27) यांनी फिर्याद दिली आहे. आरोपी आर्यन नाना फुलगे (22) व समाधान प्रकाश फुलगे (21) यांनी उसने घेतलेल्या पैशांची तात्काळ मागणी केली. फिर्यादीने "1 किंवा 2 तारखेला पैसे देतो" असे सांगताच आरोपी संतापले. त्यापैकी एकाने फिर्यादीला पकडून ठेवले, तर दुसऱ्याने लहान चाकूने पोट व मानेवर वार करून गंभीर जखमी केले. त्यानंतर जवळच पडलेल्या लाकडी दांडक्याने डोक्यात मारहाण करून आरोपी घटनास्थळावरून पसार झाले.

या प्रकरणाचा पुढील तपास आळंदी पोलीस करत आहेत.




# पिरंगुट घाटात हिट अँड रन; अज्ञात वाहनाच्या धडकेत 40 वर्षीय व्यक्तीचा मृत्यू

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड प्रतिनिधी :**

**पिरंगुट घाटात भरधाव अज्ञात वाहनाने दुचाकीस्वाराला पाठीमागून जोरदार धडक देऊन अपघातस्थळावरून पलायन केल्याची घटना घडली. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या आशुतोष शर्मा (वय 40) यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी बावधन पोलीस ठाण्यात अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी (29 जुलै) रात्री सुमारे 10.20 वाजता आशुतोष शर्मा हे पिरंगुटकडे जात असताना पुण्याकडून भरधाव येणाऱ्या अज्ञात वाहनाने त्यांच्या वाहनाला पाठीमागून जोरदार धडक दिली. अपघातानंतर चालकाने जखमीला मदत न करता किंवा रुग्णालयात न नेता घटनास्थळावरून पलायन केले. गंभीर दुखापतीमुळे आशुतोष शर्मा यांचा मृत्यू झाला.

याप्रकरणी बावधन पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम 106(1), 281, 324(4) तसेच मोटार वाहन कायद्यातील संबंधित कलमान्वये अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, सीसीटीव्ही आणि अन्य तांत्रिक पुराव्यांच्या आधारे वाहनाचा शोध सुरू आहे.



# आमदार शंकर जगताप यांच्या सूचनेनंतर पुनावळे काटेवस्ती मार्गावर डिव्हायडरच्या कामाला सुरुवात

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड, प्रतिनिधी : पुनावळे भुयारी मार्ग ते काटेवस्ती दरम्यानच्या मुख्य सिमेंट कॉंक्रीट रस्त्यावर वाहतुकीची सुरक्षितता वाढविण्यासाठी मध्यभागी डिव्हायडर उभारण्याच्या कामाला पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने प्रत्यक्ष सुरुवात केली आहे. आमदार शंकर जगताप यांच्या सूचनेनंतर या कामाला गती मिळाली आहे.**




मागील आठवड्यात विविध विकासकामांच्या भूमिपूजन कार्यक्रमानिमित्त पुनावळे परिसराच्या दौऱ्यावर असताना आमदार शंकर जगताप यांनी पुनावळे भुयारी मार्ग ते काटेवस्तीकडे जाणाऱ्या मुख्य सिमेंट कॉंक्रीट रस्त्याची पाहणी केली होती. यावेळी रस्त्याची गुणवत्ता समाधानकारक असल्याचे त्यांनी नमूद केले. मात्र, संपूर्ण रस्ता वाहतुकीसाठी खुला झाल्यानंतर दोन्ही बाजूंनी वेगाने धावणाऱ्या वाहनांमुळे अपघाताची शक्यता वाढत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने रस्त्याच्या मध्यभागी तातडीने डिव्हायडर उभारण्याची आवश्यकता असल्याचे सांगत त्यांनी या संदर्भात महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा करण्याच्या सूचना भाजपचे शहर जिल्हा सचिव नवनाथ मारुती ढवळे यांना दिल्या.

आमदारांच्या सूचनेनुसार नवनाथ ढवळे यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागाशी संपर्क साधून पत्राद्वारे डिव्हायडर उभारण्याची मागणी केली. नागरिकांच्या हिताचा विचार करून हे काम तातडीने हाती घ्यावे, अशी विनंती त्यांनी केली होती.

या मागणीची सकारात्मक दखल घेत महापालिकेने कालपासून पुनावळे भुयारी मार्ग ते काटेवस्तीकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर डिव्हायडर उभारण्याचे काम सुरु केले आहे. या कामामुळे वाहतुकीला अधिक शिस्त लागण्यास मदत होणार असून समोरासमोर होणाऱ्या अपघातांना आळा बसेल आणि नागरिकांचा प्रवास अधिक सुरक्षित होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या लोकहिताच्या कामासाठी आमदार शंकर जगताप यांच्या दूरदृष्टीपूर्ण सूचनेबद्दल तसेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तातडीने कार्यवाही केल्याबद्दल पुनावळे ग्रामस्थांच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले. अशी माहिती भाजपचे शहर जिल्हा सचिव नवनाथ मारुती ढवळे यांनी दिली.

# नगरसेविका अर्चना तापकीर यांच्या नवीन जनसंपर्क कार्यालयाचे उत्साहात उद्घाटन

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नगरसेविका अर्चना तापकीर यांच्या नवीन जनसंपर्क कार्यालयाचा उद्घाटन सोहळा लोकप्रिय आमदार शंकर जगताप यांच्या शुभहस्ते अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्याला परिसरातील नागरिक, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शुभेच्छांचा वर्षाव केला.**



यावेळी उपस्थितांना संबोधित करताना जनतेशी सातत्याने संपर्क ठेवून त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी जनसंपर्क कार्यालय महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. नागरिकांनी दाखविलेला विश्वास आणि प्रेम हे अधिक जोमाने जनसेवा करण्याची प्रेरणा देणारे असल्याची भावना अर्चना तापकीर यांनी व्यक्त केली.या उद्घाटन सोहळ्यास ज्ञानेश्वर तापकीर, स्थायी समिती सभापती अभिषेक दादा बारणे, नगरसेवक बाबासाहेब त्रिभुवन, विनोदभाऊ नढे, नगरसेविका सविताताई खुळे, नीताताई पाडाळे, कोमलताई काळे, संतोष दादा कलाटे, प्रशांत विनोदे, संदीपभाऊ गाडे, प्रवीणभाऊ वाघमोडे, राहुलभाऊ दुधाळे, सोमनाथ दादा तापकीर, सनीदादा बारणे, आयुषदादा निंबारकर, आदेश नखाते, राजेंद्र पवार, विनोद नखाते, संजय भोसले, अभिषेक वाळके, हनुमंत पिसाळ, विशाल माळी, निलेशभाऊ तापकीर, निलेशभाऊ तापकीर युवा मंच, विनोदभाऊ तापकीर मित्र परिवार, कमलताई कांबळे, रेखाताई काटे, सुजाताताई ढोपे, अरुणाताई शिंदे, अनिताताई चोपडे, रक्षाताई पाटील, राजश्रीताई शुक्ला, सिमाताई आव्हाळे, सुरेखाताई पाठक, शर्मिला गावडे, दीपाताई पाटील यांच्यासह असंख्य नागरिक, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी अर्चना तापकीर यांना पुढील जनसेवेसाठी शुभेच्छा देत, नव्या जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून नागरिकांच्या समस्या अधिक प्रभावीपणे सोडविल्या जातील, असा विश्वास व्यक्त केला. उद्घाटनानंतर उपस्थितांनी नव्या कार्यालयाला भेट देऊन शुभेच्छा दिल्या. संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968